imc

सिग्नल शाळा
समर्थ भारत व्यासपीठाचा उपक्रम

चेंबूर सिग्नल शाळा
कार्य अहवाल एप्रिल २०२६

# सिग्नल वरील बेघर व स्थलांतरित मुलांना शिक्षणाच्या मूळ प्रवाहात आणणारा पॅटर्न ...

## ही शाळा नाही, हा बदलाचा प्रवास आहे



# पूर्व प्राथमिक
# आकार ओळख

पूर्व प्राथमिक वर्गातील मुलांना भौमितिक आकारांची ओळख करून देण्यात आली. या उपक्रमात मुलांना वर्तुळ, त्रिकोण, आयत, चौकोन यांसारख्या मूलभूत आकारांची ओळख आकर्षक व खेळकर पद्धतीने करून देण्यात आली.

वर्गामध्येच घोटीव (रंगीत) कागद, कात्री व गोंद यांच्या साहाय्याने विविध आकार तयार करण्यात आले. या आकारांना कार्टूनसदृश रूप देण्यात आले. उदा. वर्तुळाला चेहरा, त्रिकोणाला हात, पाय ज्यामुळे मुलांना ते अधिक आवडले व लक्षात ठेवणे सोपे झाले. या प्रक्रियेमुळे मुलांची सर्जनशीलता देखील विकसित झाली. तसेच, वर्गात विविध खेळण्यांच्या माध्यमातून (उदा. चेंडू, ब्लॉक्स, पझल्स) मुलांना प्रत्यक्ष उदाहरणे दाखवण्यात आली. शिक्षकांनी प्रत्येक खेळण्याचा आकार कोणता आहे हे मुलांकडून ओळखून घेतले, ज्यामुळे त्यांचा सहभाग वाढला. “हा कोणता आकार आहे?” किंवा “तुझ्या आसपास असा आकार कुठे दिसतो?” अशा प्रश्नांमुळे मुलांची निरीक्षणशक्ती व विचार करण्याची क्षमता वाढीस लागली.








# पूर्व प्राथमिक

## आकार ओळख

याशिवाय, आकार ओळखण्यासाठी लहान खेळ घेतले गेले. जसे की योग्य आकार योग्य जागी ठेवणे, आकार जुळवा (matching game), किंवा वर्गात दिलेल्या आकारांचा शोध घेणे. या सर्व उपक्रमांमुळे शिकणे आनंददायी झाले आणि मुलांनी सहजपणे भौमितिक आकारांची ओळख आत्मसात केली.





# रंग ओळख

पूर्व प्राथमिक स्तरावर मुलांना रंगांची ओळख करून देणे हा त्यांच्या निरीक्षणात्मक विकासाचा अत्यंत महत्त्वाचा भाग आहे. या उपक्रमात रंगीत घोटीव कागद व रंगीत चेंडू यांच्या साहाय्याने मुलांकडून रंग ओळखण्याचा सराव आनंददायी पद्धतीने करून घेण्यात आला.

सुरुवातीला शिक्षकांनी विविध रंगांचे (लाल, निळा, पिवळा, हिरवा इ.) घोटीव कागद मुलांसमोर मांडले. प्रत्येक रंगाचे नाव स्पष्ट उच्चारून सांगितले आणि मुलांकडून तो रंग पुन्हा म्हणवून घेतला. यामुळे मुलांना रंगांची नावे लक्षात ठेवण्यास मदत झाली. त्यानंतर त्याच रंगांचे चेंडू दाखवून “हा कोणता रंग आहे?” असे प्रश्न विचारले गेले, ज्यामुळे मुलांचा सहभाग वाढला.

यानंतर प्रत्यक्ष कृतीवर भर देण्यात आला. मुलांना विविध रंगांचे चेंडू दिले गेले आणि त्यांना त्या-त्या रंगाच्या कागदावर ठेवण्यास सांगितले. मुलांना रंग ओळखण्याचा सराव अधिक दृढ झाला. या उपक्रमामुळे मुलांना केवळ रंगांची ओळख झाली नाही, तर त्यांची स्मरणशक्ती, लक्ष केंद्रित करण्याची क्षमता, तसेच हात-डोळा समन्वय (hand-eye coordination) यांचाही विकास झाला.






# अवयव ओळख

पूर्व प्राथमिक वर्गातील मुलांना शारीरिक अवयवांची ओळख करून देणे ही त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अत्यंत आवश्यक प्रक्रिया आहे. या उपक्रमात फ्लॅश कार्ड्सच्या माध्यमातून विविध अवयवांची ओळख करून देण्यात आली तसेच त्या-त्या अवयवांचा उपयोग आणि त्यांची वैशिष्ट्ये समजावून सांगण्यात आली.




सुरुवातीला शिक्षकांनी डोळे, नाक, कान, तोंड, दात, हात, पाय इत्यादी अवयवांची आकर्षक व रंगीत फ्लॅश कार्ड्स तयार केली. प्रत्येक कार्डवर संबंधित अवयवाचे स्पष्ट चित्र दाखवण्यात आले. मुलांना एक-एक कार्ड दाखवून त्या अवयवाचे नाव सांगितले आणि मुलांकडून ते नाव पुन्हा म्हणवून घेतले, ज्यामुळे त्यांची ओळख अधिक पक्की झाली.








यानंतर प्रत्येक अवयवाचा उपयोग समजावून सांगण्यासाठी प्रत्यक्ष वस्तूंचा वापर करण्यात आला. उदाहरणार्थ, नाक या अवयवासाठी फुले दाखवून “नाकाने वास घेतो” हे समजावले; अशा प्रकारे प्रत्यक्ष उदाहरणांमुळे मुलांना अवयवांचे कार्य सहज समजले.

याशिवाय, मुलांना सहभागी करून घेण्यासाठी विविध कृती व खेळ घेतले गेले. “हा कोणता अवयव?”, “याचा उपयोग काय?” असे प्रश्न विचारून मुलांचा सहभाग वाढवण्यात आला. काही क्रियाकलापांमध्ये मुलांना योग्य अवयवाशी संबंधित वस्तू जुळवण्यास सांगितले गेले, ज्यामुळे त्यांची समज अधिक दृढ झाली. या उपक्रमाद्वारे मुलांना शारीरिक अवयवांची ओळख, त्यांचे कार्य आणि उपयोग समजण्यास मदत झाली. तसेच त्यांची निरीक्षणशक्ती, स्मरणशक्ती आणि संवाद कौशल्ये यांचाही विकास झाला. एकूणच, फ्लॅश कार्ड्स व प्रत्यक्ष वस्तूंच्या वापरामुळे शिक्षण अधिक सजीव, प्रभावी आणि आनंददायी ठरले.

# प्राथमिक

## फुलपाखरातील रुपांतरण




परिसर अभ्यासाच्या अंतर्गत मुलांना निसर्गातील बदल समजावून देण्यासाठी “फुलपाखराचे रुपांतरण” हा विषय सोपा पद्धतीने शिकविण्यात आला. या उपक्रमाद्वारे मुलांना फुलपाखराच्या जीवनचक्रातील विविध अवस्था उदा. अंडे, अळी, कोश आणि पूर्ण विकसित फुलपाखरू यांची ओळख करून देण्यात आली.

शिक्षकांनी फुलपाखराच्या जीवनचक्राची रंगीत ३D स्वरुवापातील प्रतिकृती तयार करून वर्गात लावली. प्रत्येक अवस्थेचे चित्र स्पष्टपणे दाखवून त्याची माहिती सांगितली. प्रत्येक अवस्थेसाठी वेगवेगळे आकृतिबंध तयार करून त्यांना योग्य क्रमाने लावण्यात आले. या दृश्य माध्यमामुळे मुलांना संपूर्ण प्रक्रिया सहज समजली आणि लक्षात ठेवणे सोपे झाले.





मुलांचा सहभाग वाढवण्यासाठी विविध कृती घेतल्या गेल्या. उदा. “ही कोणती अवस्था आहे?”, “यानंतर काय होईल?” असे प्रश्न विचारून त्यांना विचार करायला प्रवृत्त केले. काही मुलांना त्या-त्या अवस्थांचे क्रम लावण्यास सांगितले गेले, ज्यामुळे त्यांची समज अधिक दृढ झाली. या उपक्रमामुळे मुलांना फुलपाखराच्या रुपांतरणाची संपूर्ण प्रक्रिया समजलीच, पण त्यांच्या निरीक्षणशक्ती, स्मरणशक्ती आणि निसर्गाबद्दलची जिज्ञासा देखील वाढली. एकूणच, प्रत्यक्ष शैक्षणिक साहित्य व कृतींच्या साहाय्याने शिकवलेला हा धडा मुलांसाठी आनंददायी व प्रभावी ठरला.

# भौमितिक आकार ओळख

पूर्व प्राथमिक वर्गातील मुलांना भौमितिक आकारांचा सराव अधिक परिणामकारक व आनंददायी व्हावा या उद्देशाने चित्राच्या माध्यमातून उपक्रम घेण्यात आला. या उपक्रमात फुलपाखराच्या चित्राचा उपयोग करून त्याच्या पंखांमध्ये विविध भौमितिक आकार समाविष्ट करण्यात आले.

सुरुवातीला शिक्षकांनी चार्टवर फुलपाखराचे मोठे व आकर्षक चित्र काढले. त्यानंतर त्या फुलपाखराच्या पंखांमध्ये वर्तुळ, त्रिकोण, चौकोन, आयत असे विविध आकार काढून दाखवले. प्रत्येक आकाराचे नाव पुन्हा एकदा मुलांना सांगितले व त्यांच्याकडून ओळख करून घेतली.

यानंतर मुलांनी शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली फुलपाखराच्या पंखांमध्ये वेगवेगळे भौमितिक आकार काढले. ही कृती करताना मुलांनी आधी शिकलेले आकार आठवून योग्य ठिकाणी काढण्याचा प्रयत्न केला. पुढील टप्प्यात मुलांना विविध रंगांचा वापर करून त्या आकारांना रंगवण्यास सांगितले गेले. प्रत्येक आकाराला वेगळा रंग देण्यास प्रोत्साहन दिल्यामुळे रंगांची ओळखही अधिक दृढ झाली. या प्रक्रियेमुळे मुलांची सर्जनशीलता, रंगसंगतीची समज आणि हात-डोळा समन्वय (hand-eye coordination) विकसित झाला. या उपक्रमामुळे मुलांना भौमितिक आकारांचा पुनरावृत्तीने सराव मिळाला, तसेच चित्रकलेच्या माध्यमातून शिकणे अधिक रंजक व सोपे झाले. एकूणच, फुलपाखराच्या आकर्षक चित्रामुळे मुलांनी उत्साहाने सहभाग घेतला आणि शिकण्याची प्रक्रिया आनंददायी ठरली.









# माध्यमिक

“संत परंपरा” या विषयांतर्गत संत नामदेव व संत तुकाराम यांच्या जीवनकार्याची माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली. त्यांच्या अभंगरचना, समाजप्रबोधनाचे कार्य, भक्तीभाव आणि समाजातील योगदान याविषयी चर्चा करण्यात आली. विद्यार्थ्यांच्या सहभागातून दोन्ही संतांची वैशिष्ट्ये समजावून सांगण्यात आली. तसेच संत नामदेव आणि संत तुकाराम यांच्यावरील माहितीचा तक्ता वर्गात तयार करण्यात आला.

इंग्रजी विषयामध्ये “Self Introduction” या घटकावर विशेष सराव घेण्यात आला. विद्यार्थ्यांना इंग्रजीमध्ये स्वतःचा परिचय आत्मविश्वासाने कसा द्यावा याचे मार्गदर्शन करण्यात आले. उदाहरणार्थ – स्वतःचे नाव सांगणे, शाळेचे नाव सांगणे, राहण्याचे ठिकाण, इयत्ता, छंद इत्यादी वाक्यांचा सराव करून घेतला. विद्यार्थ्यांकडून प्रत्यक्ष उभे राहून परिचय सांगण्याचा उपक्रम घेण्यात आला. त्यामुळे त्यांचा इंग्रजी बोलण्यावरील आत्मविश्वास वाढण्यास मदत झाली.






# माध्यमिक

विज्ञान विषयामध्ये "पानांचा शिराविन्यास" हा घटक प्रत्यक्ष कृतीद्वारे शिकविण्यात आला. विद्यार्थ्यांना कुंडीतील विविध वनस्पतींची पाने निरीक्षणासाठी दाखविण्यात आली. पानांवरील शिरांचे प्रकार, त्यांची रचना आणि वैशिष्ट्ये यांचे निरीक्षण करून विद्यार्थ्यांनी शिराविन्यास ओळखण्याचा प्रयत्न केला. प्रत्यक्ष निरीक्षणामुळे विद्यार्थ्यांना विषय अधिक स्पष्टपणे समजला व अध्ययनामध्ये रुची निर्माण झाली.












# शब्द बँक

‘शब्द बँक’ हा उपक्रम विद्यार्थ्यांच्या भाषिक विकासासाठी अत्यंत उपयुक्त ठरतो. या शैक्षणिक उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना दैनंदिन जीवनात वाचनात येणारे किंवा नव्याने शिकलेले मराठी, हिंदी व इंग्रजी या तिन्ही भाषांतील शब्द संकलित करण्यास प्रोत्साहित करण्यात येते. प्रत्येक विद्यार्थी नवीन शब्द छोट्या चिठ्ठीवर स्वच्छ अक्षरात लिहून त्या चिठ्ठ्या “शब्द बँक” मध्ये जमा करतो. या प्रक्रियेमुळे विद्यार्थ्यांमध्ये नवीन शब्द शोधण्याची उत्सुकता निर्माण होत आहे.

आठवड्याच्या शेवटी शब्द बँकेत जमा झालेल्या सर्व शब्दांचे वर्गामध्ये सामूहिक वाचन करण्यात येते. शब्दांचे योग्य उच्चार, अर्थ आणि त्यांचा वाक्यात उपयोग याविषयी विद्यार्थ्यांशी चर्चा केली जाते. काही विद्यार्थ्यांना त्या शब्दांचा वापर करून छोटे वाक्य तयार करण्यासही सांगितले जाते. त्यामुळे विद्यार्थ्यांचा शब्दसंग्रह अधिक समृद्ध होत असून भाषेवरील पकड मजबूत होत आहे. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांची वाचन क्षमता, लेखन कौशल्य, उच्चारशुद्धता आणि भाषिक आत्मविश्वास वाढण्यास मदत होत आहे.









# खेळ प्रशिक्षण


विद्यार्थ्यांच्या शारीरिक, मानसिक विकासासाठी शाळेमध्ये नियमितपणे मैदानी खेळांचे प्रशिक्षण घेण्यात येते. विद्यार्थ्यांना विविध खेळांची ओळख करून देत त्यांच्यामध्ये खेळाविषयी आवड आणि संघभावना विकसित करण्याचा प्रयत्न केला जात आहे. कबड्डी, खो-खो आणि क्रिकेट या लोकप्रिय मैदानी खेळांचा सराव विद्यार्थ्यांकडून नियमितपणे करून घेतला जातो.

खेळांच्या सरावापूर्वी विद्यार्थ्यांकडून शारीरिक व्यायाम करून घेतला जातो. यामध्ये धावणे, हात-पायांचे स्ट्रेचिंग, उड्या मारणे, संतुलनाचे व्यायाम तसेच शरीर लवचिक ठेवण्यासाठी विविध हालचालींचा समावेश असतो. या व्यायामामुळे विद्यार्थ्यांचे शरीर तंदुरुस्त राहण्यास मदत होते.  कबड्डीच्या सरावामध्ये पकड, चपळता, श्वास नियंत्रण आणि संघनियोजन यावर भर दिला जातो. क्रिकेट प्रशिक्षणामध्ये फलंदाजी, गोलंदाजी, क्षेत्ररक्षण तसेच खेळाचे नियम समजावून सांगितले जातात. विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग घेत खेळातील कौशल्ये आत्मसात करण्याचा प्रयत्न करत आहेत. यामुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, शिस्त, सहकार्याची भावना आणि नेतृत्वगुण विकसित होत आहेत. नियमित मैदानी खेळांमुळे विद्यार्थ्यांचे आरोग्य सुधारण्यासोबतच मानसिक ताण कमी होण्यास मदत होत आहे. खेळाच्या माध्यमातून आनंददायी शिक्षण वातावरण निर्माण होण्यास मदत होते.







# शिवणकाम

विद्यार्थिनींमध्ये उपयुक्त व्यावसायिक कौशल्यांचा विकास व्हावा या उद्देशाने प्राथमिक स्वरूपातील शिवणकाम प्रशिक्षण उपक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रमामध्ये मुलींना शिवणकामाची मूलभूत माहिती प्रत्यक्ष कृतीद्वारे शिकविण्यात येत आहे. सुरुवातीला सुईमध्ये दोरा ओवणे, दोऱ्याला गाठ मारणे, कापड व्यवस्थित पकडणे यांसारख्या प्राथमिक गोष्टींचा सराव करून घेण्यात आला.







त्यानंतर विद्यार्थिनींना साधे टाके कसे घालावेत याचे प्रात्यक्षिक दाखविण्यात आले. सरळ रेषेत टाके घालणे, समान अंतर राखणे आणि स्वच्छ शिवण करण्याचा सराव मुलींनी उत्साहाने केला. तसेच रिंगमध्ये कपडा योग्य प्रकारे बसवून त्यावर टाके घालण्याचे प्रशिक्षणही देण्यात आले. या प्रक्रियेमुळे विद्यार्थिनींना हाताची हालचाल नियंत्रित ठेवणे, एकाग्रतेने काम करणे आणि संयम राखणे याचा अनुभव मिळत आहे. शिवणकामाच्या या उपक्रमामुळे विद्यार्थिनींमध्ये स्वावलंबनाची भावना विकसित होत आहे. हातकौशल्य, सर्जनशीलता आणि सूक्ष्म निरीक्षण क्षमता वाढण्यास मदत होत आहे. प्रत्यक्ष कृतीतून शिकण्याची संधी मिळाल्यामुळे विद्यार्थिनींचा सहभाग अधिक वाढला असून त्या आनंदाने प्रशिक्षण घेत आहेत.





# वाचन

शाळेच्या ग्रंथालयामध्ये विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची गोडी लागावी या उद्देशाने मराठी, हिंदी आणि इंग्रजी या तिन्ही भाषांतील विविध प्रकारची पुस्तके उपलब्ध करून देण्यात आली आहेत. विद्यार्थ्यांच्या वयोगटानुसार आणि आवडीनुसार गोष्टीरूप पुस्तके, माहितीपर पुस्तके, चित्रकथा, विज्ञान विषयावरील पुस्तके, प्रेरणादायी कथा तसेच बालसाहित्य यांचा समावेश ग्रंथालयात करण्यात आला आहे. विविध विषयांवरील आकर्षक आणि रंगीत पुस्तकांमुळे विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची गोडी निर्माण होत आहे.








विद्यार्थ्यांना विशेषतः गोष्टीरूप आणि चित्रकथा स्वरूपातील पुस्तके वाचायला आणि ऐकायला खूप आवडतात. चित्रांच्या माध्यमातून कथा समजून घेण्याची त्यांची उत्सुकता वाढते. शिक्षक विद्यार्थ्यांना नियमितपणे पुस्तके वाचून दाखवतात. योग्य उच्चार, भावपूर्ण वाचन आणि कथेमधील आशय समजावून सांगून विद्यार्थ्यांना पुस्तकांशी जोडण्याचा प्रयत्न केला जातो. वाचनानंतर विद्यार्थ्यांशी चर्चाही केली जाते, ज्यामुळे त्यांची आकलन क्षमता आणि अभिव्यक्ती कौशल्य विकसित होत आहे. काही वेळा विद्यार्थ्यांनाही पुस्तकातील गोष्ट स्वतः वाचून सांगण्याची संधी दिली जाते, त्यामुळे त्यांचा आत्मविश्वास वाढत आहे. या वाचन उपक्रमामुळे विद्यार्थ्यांची भाषिक कौशल्ये, शब्दसंपदा, कल्पनाशक्ती आणि विचारशक्ती विकसित होत आहे.






# जागतिक वसुंधरा दिन

२२ एप्रिल रोजी शाळेत जागतिक वसुंधरा दिन उत्साहात साजरा करण्यात आला. पर्यावरण संवर्धनाचे महत्त्व पोहोचवण्यासाठी या दिवसाचे औचित्य साधून विद्यार्थ्यांनी “पृथ्वी वाचवा” या विषयावर आधारित एक सुंदर आणि संदेशपूर्ण छोटी नाटिका सादर केली.















# जागतिक वसुंधरा दिन

या नाटिकेत एका मुलीने पृथ्वीची भूमिका प्रभावीपणे साकारली होती. तिने पृथ्वीचे दुःख, वाढते प्रदूषण, झाडांची होणारी तोड आणि सर्वत्र वाढणारा कचरा यामुळे पृथ्वी कशी त्रस्त झाली आहे, हे आपल्या सांगितले. इतर विद्यार्थ्यांनी पादचारी व सामान्य नागरिकांच्या भूमिका साकारल्या. काही जणांनी रस्त्यावर कचरा टाकणारे लोक दाखवले, तर काहींनी जागरूक नागरिक बनून तो कचरा उचलून कचरापेटीत टाकण्याचे काम केले. नाटिकेमध्ये “स्वच्छ परिसर, सुंदर परिसर”, “झाडे लावा, पृथ्वी वाचवा” आणि “प्लास्टिकचा वापर कमी करा” असे घोषवाक्यही विद्यार्थ्यांनी दिले. या सादरीकरणातून स्वच्छता राखणे, सार्वजनिक ठिकाणी कचरा न टाकणे आणि पर्यावरणाचे रक्षण करणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे, हा महत्त्वपूर्ण संदेश देण्यात आला.









# डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती

डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती मोठ्या उत्साहात व आदरपूर्वक वर्गात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात डॉ. बाबासाहेबांच्या प्रतिमेला हार व फुले अर्पण करून करण्यात आली. सर्व विद्यार्थ्यांनी आणि शिक्षकांनी त्यांच्या प्रतिमेसमोर नतमस्तक होऊन त्यांना अभिवादन केले.







यानंतर विद्यार्थ्यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनकार्याविषयी सविस्तर माहिती देण्यात आली. त्यांच्या शिक्षणप्रेम, सामाजिक समता, न्याय आणि संविधान निर्मितीतील योगदान यावर वर्गात प्रोजेक्टरच्या माध्यमातून डॉ. बाबासाहेबांच्या जीवनावर आधारित सिनेमा दाखविण्यात आला. या चित्रपटातून त्यांच्या आयुष्यातील महत्त्वाच्या घटना, त्यांनी केलेले कार्य आणि समाजासाठी दिलेले योगदान विद्यार्थ्यांना प्रभावीपणे समजले.



# अक्षय तृतीया

अक्षय तृतीया निमित्त शाळेत विद्यार्थ्यांना अक्षय तृतीया या सणाचे धार्मिक, सांस्कृतिक आणि ऐतिहासिक महत्त्व समजावून सांगण्यात आले. शिक्षकांनी या दिवसाचे वैशिष्ट्य स्पष्ट करताना, हिंदू संस्कृतीत अक्षय तृतीया हा अत्यंत शुभ दिवस मानला जातो, असे सांगितले.

प्रोजेक्टरच्या माध्यमातून अक्षय तृतीयेविषयी माहितीपूर्ण आणि आकर्षक व्हिडिओ दाखवण्यात आले. या व्हिडिओंमधून सण साजरा करण्याच्या विविध पद्धती, पारंपरिक पूजा, दानधर्म, तसेच पर्यावरणपूरक पद्धतीने सण साजरा करण्याचे संदेश विद्यार्थ्यांना मिळाले. चित्रफितींमुळे विद्यार्थ्यांना विषय अधिक रंजक आणि समजण्यास सोपा वाटला. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये भारतीय संस्कृती, परंपरा आणि सणांविषयी अधिक जागरूकता निर्माण झाली.












# मी बनविलेला पदार्थ

पाककला या वर्गात मुलींनी अत्यंत उत्साहाने चॉकलेट तयार करण्याची प्रक्रिया शिकली आणि प्रत्यक्ष अनुभव घेतला. सुरुवातीला शिक्षकांनी चॉकलेट बनवण्यासाठी लागणारे साहित्य, स्वच्छतेचे महत्त्व आणि योग्य पद्धती याविषयी माहिती दिली.



यानंतर मुलींनी चॉकलेट वितळविण्याची प्रक्रिया केली. गॅसच्या मंद आचेवर चॉकलेट कसे वितळवायचे, याचे प्रात्यक्षिक दाखवण्यात आले. वितळलेले चॉकलेट गुठळ्या न होता एकसारखे होण्यासाठी ते व्यवस्थित फेटण्याची क्रिया विद्यार्थिनींनी काळजीपूर्वक केली. त्यानंतर तयार झालेले मिश्रण विविध आकारांच्या साच्यांमध्ये ओतण्यात आले. काही मुलींनी त्यामध्ये ड्रायफ्रूट्स, रंगीत सजावटीचे पदार्थ वापरून चॉकलेट अधिक आकर्षक बनवले.

साचे थंड होण्यासाठी ठेवण्यात आले आणि त्यानंतर सुंदर आकारातील चॉकलेट तयार झाले. स्वतःच्या हाताने तयार केलेले चॉकलेट पाहून विद्यार्थिनींना खूप आनंद झाला. या उपक्रमामुळे मुलींमध्ये पाककलेची आवड वाढली तसेच स्वयंपाकातील बारकावे, संयम आणि स्वच्छतेचे महत्त्वही समजले.









# कागदकाम

कला व हस्तकला उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना कागदकामापासून पाळीव प्राण्यांचे मुखवटे तयार करण्याचे प्रशिक्षण देण्यात आले. या उपक्रमामध्ये मुलांनी रंगीत कागद, कात्री, गोंद आणि विविध सजावटीच्या साहित्याचा उपयोग करून कुत्र्याचा आकर्षक मुखवटा तयार केला.

सुरुवातीला शिक्षकांनी मुखवटा बनविण्याची पद्धत समजावून सांगितली. कागद योग्य आकारात कापणे, कान, डोळे आणि नाक यांचे आकार तयार करणे तसेच ते व्यवस्थित चिकटविणे या सर्व प्रक्रिया विद्यार्थ्यांनी उत्साहाने केल्या. काही विद्यार्थ्यांनी आपल्या कल्पकतेचा वापर करून मुखवट्यांना वेगवेगळे रंग व सजावट करून अधिक सुंदर बनवले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळाला तसेच त्यांच्या हातकौशल्य, सर्जनशीलता आणि कल्पनाशक्तीचा विकास झाला. स्वतःच्या हाताने तयार केलेला कुत्र्याचा मुखवटा पाहून मुलांना खूप आनंद झाला.









# खेळ









परीक्षा संपल्यानंतर मुलांना आनंददायी विरंगुळा मिळावा यासाठी शाळेच्या आवारात विविध खेळ घेण्यात येतात. या खेळांमध्ये विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभागी होतात. शारीरिक हालचालींमुळे मुलांमध्ये उत्साह निर्माण होतो तसेच त्यांचा मानसिक ताणही कमी होतो.

यापैकी एक विशेष खेळ हात, पाय, डोळे आणि शरीराचा तोल सांभाळण्याशी संबंधित होता. या खेळामध्ये जमिनीवर विविध चित्रे आणि चिन्हे तयार करण्यात आली होती. विद्यार्थ्यांना दिलेल्या सूचनांनुसार त्या चित्रांवर हात, पाय किंवा हाताचा पंजा ठेवायचा होता. चित्र पाहून योग्य जागी शरीराचे अवयव ठेवताना शरीराचा तोल सांभाळणे आवश्यक होते. हा खेळ खेळताना विद्यार्थ्यांना खूप मजा आली. काही वेळा तोल जात असल्याने हशा आणि आनंदाचे वातावरण निर्माण झाले. या उपक्रमामुळे मुलांची निरीक्षण क्षमता, एकाग्रता, शरीराचा समतोल राखण्याची क्षमता आणि समन्वय कौशल्य विकसित होण्यास मदत झाली.